**शरद पवार**

**कृषि, उपभोक्ता मामले, खाद्य और**
**सार्वजनिक वितरण मंत्री**

भारत सरकार

सत्यमेव जयते



# शुभेच्छा

जनसेवेचे अखंड व्रत पाळणारे माजी केंद्रीय मंत्री श्री राम नाईक यांनी 16 एप्रिल, 2009 रोजी 75 वर्षे पूर्ण केली असून याप्रीत्यर्थ अमृतमहोत्सव साजरा होत असल्याचे वाचून आनंद वाटला.

सलग तीनदा महाराष्ट्र विधानसभेत आमदार व सलग पाचदा खासदार म्हणून निवडून येऊन त्यांनी लोकसेवा केली आहे. संघाच्या शिस्तीत वाढलेल्या राम नाईकांची खरी ओळख `रेल्वे प्रवाशांचे मित्र' ही आहे. श्री अटलजींच्या नेतृत्त्वातील मंत्रिमंडळात रेल्वे राज्यमंत्री म्हणून त्यांची नेमणूक झाल्यावर त्यांनी मुंबई उपनगरीय रेल्वेच्या प्रवाशांच्या प्रश्नांना मार्गी लावण्याचा यशस्वी प्रयत्न केला. महिला प्रवाशांच्या अडचणींना समजून महिलांसाठी `महिला स्पेशल' लोकल सुरू केली.

कर्करोगासारख्या आजारास श्री राम नाईकांनी आपल्या इच्छा शक्तीने झुंज दिली आणि या रोगाला माघार घ्यावी लागली. पुढील आयुष्य हे ` बोनस लाइफ' म्हणून त्यांनी जनसेवेत समर्पित केलेले आहे.

पेट्रोलियम मंत्री म्हणून त्यांच्या कारकिर्दीत अर्ज केलेल्या सर्व ग्राहकांना घरगुती गॅस कनेक्शन देण्यात आले तर अनेक ठिकाणी पेट्रोलियम पदार्थांच्या अन्वेषणासाठी `ब्लॉक्स' देण्यात आले. खतनिर्मितीसाठी गॅसचा पुरवठा, वाहनांसाठी इथेनॉलचा उपयोग ही त्यांच्या पेट्रोलियम मंत्रालयातील कारकिर्दीची वैशिष्ट्ये आहेत.

त्यांच्या पंचाहत्तरीनिमित्त आम्हा उभयतांकडून त्यांचे मनापासून अभिनंदन आणि त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो ही शुभेच्छा.

(शरद पवार)

Office : Room No199, Krishi Bhawan, New Delhi -110001 (INDIA) Tel : 011-23388165,23782565 Fax : 011-23381767
Resi : 6, Janpath, New Delhi - 110001 (INDIA) Tel : 011-23018870, 23018619 Fax : 011-23018609
E-mail : sharadpawar@vsnl.com